तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद
शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा
पत्र पेटी क्र -५१६ औरंगाबाद - ४३१ ००५
(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०
http://www.dteau.org roaurangabad.dte@gmail.com

**कार्यालयीन आदेश :**

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/बदल्या/२०१७/२००९
दिनांक 31 MAY 2017

**संदर्भ :-** १) उच्च व तंत्रशिक्षण आणि सेवायोजन विभाग शासन निर्णय क्र. जीईसी/३३९७/७३७६/तांशि-१, दि. १०-०४-१९९७
२) महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्य पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५
३) उच्च व तंत्रशिक्षण विभाग शा.नि.क्र.संकिर्ण-२०१५/(०१/१५) मशि-१, दि.२५-५-२०१५
४) नागरी सेवा मंडळाची बैठक दिनांक २३-५-२०१७

महाराष्ट्र शासकीय कर्मचा-यांच्या बदल्यांचे विनियमन आणि शासकीय कर्तव्ये पार पाडतांना होणा-या विलंबास प्रतिबंध अधिनियम, २००५ मधील (सन २००६ महा. २१ ) च्या कलम ७ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन, विभागाच्या दिनांक २८-५-२०१५ च्या अधिसुचनेद्वारे उच्च व तंत्रशिक्षण विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील तंत्रशिक्षण संचालनालयाच्या अधिपत्याखालील गट-क साठी बदली करणारे सक्षम प्राधिकरण म्हणून विभागीय सहसंचालकांना पदनिर्देशित करण्यात आलेले आहे.

त्यास अनुसरुन वरील संदर्भ क्र-३ च्या शासन निर्णयान्वये गठित नागरी सेवा मंडळ यांच्या समक्ष प्रस्ताव ठेवून व त्यांची मान्यता घेऊन सहसंचालक , तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद यांना उपरोक्त संदर्भिय शासन निर्णय क्र. १ व २ अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन या कार्यालयाच्या अधिनस्त संस्था/कार्यालयातील गट-क संवर्गातील (तांत्रिक) खालील कर्मचा-यांच्या त्यांच्या नावासमोर दर्शविलेल्या ठिकाणी विनंती/प्रशासकीय कारणास्तव विभागांतर्गत बदल्या करण्यात येत आहेत.

| अ. क्र. | कर्मचा-यांचे नाव, पदनाम व सद्याचे कार्यरत ठिकाण | बदली/पदस्थापनेनंतरचे ठिकाण | बदलीचे स्वरुप |
|---|---|---|---|
| | **संधाता** | | |
| १ | श्री. एम. जे. संग्राम, संधाता, शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद | शासकीय तंत्रनिकेतन, बीड येथे श्री. बी. व्ही. लिगाडे यांच्या विनंती बदलीने रिक्त होणा-या पदावर | प्रशासकीय बदली |
| २ | श्री. बी. व्ही. लिगाडे, संधाता, शासकीय तंत्रनिकेतन, बीड | पु. ला. शासकीय तंत्रनिकेतन, लातूर येथे श्री डी. व्ही. पवार यांच्या विनंती बदलीने रिक्त होणा-या पदावर | विनंती बदली |
| ३ | श्री. डी. व्ही. पवार, पु. ला. शासकीय तंत्रकितन, लातूर | शासकीय तंत्रनिकेतन, उस्मानाबाद येथे श्री. एम. जे. संग्राम यांच्या प्रशासकीय बदलीने रिक्त होणा-या पदावर | विनंती बदली |

उपरोक्त कर्मचा-यांनी बदली करण्यात आलेल्या संस्थेत/कार्यालयात तात्काळ रुजू व्हावे. ज्या कर्मचा-यांची बदली त्यांच्या विनंतीवरुन करण्यात आलेली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहणार नाही. तसेच ज्या कर्मचा-यांची बदली प्रशासकीय कारणास्तव करण्यात आलेली आहे त्यांना बदलीच्या ठिकाणी हजर होण्यासाठी नियमानुसार प्रवासखर्च व पदग्रहण अवधी अनुज्ञेय राहील.

**(महेश शिवणकर)**
**प्र.सहसंचालक,**
**तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,औरंगाबाद**

**प्रत, माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी अग्रेषित**

०१ मा. संचालक तंत्रशिक्षण संचालनालय म. रा. मुंबई-१ यांना माहितीस्तव सादर.
०२ कोषागार अधिकारी जिल्हा कोषागार कार्यालय, बीड/उस्मानाबाद/लातूर
०३ प्राचार्य, शासकीय तंत्रनिकेतन, बीड/उस्मानाबाद/पु.ला. लातूर
०४ संबधित संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, बदली झालेल्या कर्मचा-यांना त्यांच्याकडे असलेला कार्यभार हस्तांतरीत करण्याबाबतची कार्यवाही करुन तात्काळ कार्यमुक्त करण्यात यावे व बदली झालेल्या संस्थेत कर्मचा-यांना बदलीच्या ठिकाणी रुजू करुन घेण्यात यावे तसेच बदली करण्यात आलेल्यो संबधित कर्मचा-यांची ईएमआयएस या प्रणालीमध्ये नोंद घेण्यात यावी.
०५ संबधित कर्मचारी (संस्था/कार्यालयप्रमुखामार्फत)